| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHJN040000762021 | दाखल दिनांक | : | ०८ | ०१ | २०२१ |
| | नोंदणी दिनांक | : | ०८ | ०१ | २०२१ |
| | निकाल दिनांक | : | २२ | ०६ | २०२६ |
| | कालावधी | : | ५ व. | ५ म. | १४ दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.१, अंबड यांचे न्यायालयात**
(पिठासीन न्यायाधीश – एस.एस. जैन )

**नि. फौ. ख. क्र.३५/२०२१** **निशाणी क्र.२१**

(प्रथम खबर अहवाल क्रमांक – ४८०/२०२०)
(अपराध कलम – भा.दं.वि. चे कलम ३२४, ५०४ प्रमाणे शिक्षेस पात्र, पोलीस ठाणे – अंबड)

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस ठाणे, अंबड
ता.अंबड, जि. जालना. ... **अभियोग पक्ष**

**श्री. बी. ई. निकम सहा. सरकारी अभियोक्ता.**

**– विरुध्द –**

विष्णू सुभाष मसकर, वय–३३ वर्षे,
रा. पारनेर,ता. अंबड, जि. जालना ... **आरोपी**

**श्री. ए. बी. काकडे आरोपीचे विधीज्ञ**

| | |
|---|---|
| अपराध दिनांक | ०८.१०.२०२० |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०९.१०.२०२० |
| दोषारोपपत्र दिनांक | ०८.०१.२०२१ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | २४.०३.२०२६ |
| पुरावा आरंभ झाल्याची दिनांक | २०.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाची राखीव दिनांक | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | २२.०६.२०२६ |
| शिक्षा लादलेली असल्यास दिनांक | निरंक. |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष किंवा दोषी | लादलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विष्णू सुभाष मसकर | २७.१०.२०२० | २७.१०.२०२० | भा.दं.वी चे कलम ३२४, ५०४, प्रमाणे. | निर्दोष | निरंक | --- |

**अ. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी :-**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ.सा.-१ | विकास बंडू भोजने (नि.क्र.१५) | फिर्यादी |

**ब. आरोपीच्या साक्षीदारांची यादी :-**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

**क. न्यायालयीन साक्षीदार :-**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

**निशाणी क्रमांकाची यादी :-**

**अ. अभियोगपक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | -- | -- |

**ब. बचावपक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | १४ | तडजोड पूरशिस |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | ९ | दोषारोप |
| २. | १० | दोषारोपावरील आरोपींचे निवेदन |

**ड. मुद्देमाल :**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | २१५/२०२० | एक चाकू |

**न्यायनिर्णय**
(दिनांक २२/०६/२०२६)

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

फिर्यादी विकास बंडू भोजने हा दिनांक ०८.१०.२०२० रोजी सायंकाळी सुमारे ४.०० वाजण्याच्या सुमारास महालक्ष्मी पेट्रोल पंप, अंबड येथे असतांना आरोपी विष्णु सुभाष मसकर आला व त्याला म्हणाला की, "तुझ्याकडे काम आहे, तु पारनेर गावात ये" तेव्हा फिर्यादी त्यास म्हणाला की, "काय काम आहे" तेव्हा आरोपी त्याला म्हणाला की, "तू पारनेर गावात आल्यावर सांगतो" त्यानंतर फिर्यादी सायंकाळी सुमारे ५.०० वाजण्याच्या सुमारास पारनेर गावात गेला व आरोपीस दूरध्वनीद्वारे बोलावून घेतले. फिर्यादीने आरोपीस कामाविषयी विचारणा केली. त्यावेळी आरोपीने फिर्यादीकडे ₹२५,०००/– खर्चासाठी मागितले. फिर्यादीने स्वतःकडे पैसे नसल्याचे सांगून आरोपीची मागणी नाकारली. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ केली व चाकूने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या तळहातावर व उजव्या मांडीवर वार केला. त्यामुळे फिर्यादीच्या डाव्या हाताच्या तळहातास व उजव्या मांडीस दुखापत होऊन रक्तस्त्राव झाला. आरोपीच्या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी फिर्यादी घटनास्थळावरून पळून गेला व अंबड पोलीस स्टेशनला येवून आरोपीविरूध्द फिर्याद नोंदविली.

२. या आशयाच्या फिर्यादवरुन गुन्हा क्र.४८०/२०२० प्रमाणे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ५०४ अन्वये पोलीस स्टेशन, अंबड येथे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी गुन्हयाचा तपास करून घटनास्थळ पंचनामा केला व मुद्देमाल पावती बनवली व जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व संबंधीत साक्षीदाराचे जाबजबाब नोंदवुन तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र न्यायप्रविष्ट केले.

३. आरोपीविरूध्द भा.द.वि.चे कलम ३२४ व ५०४ अन्वये निशाणी क्र.९ वर दोषारोप निश्चित केला व तो आरोपीला त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगीतला असता त्याने तो कबूल नसल्याचे सांगीतले व खटला चालवावा असे प्रतिपादन केले. प्रकरणादरम्यान फिर्यादी व आरोपी यांनी तडजोड पुरशिस (नि.क्र.१४) दाखल करून त्यांच्यात तडजोड झाल्याचे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द दोषाहार्य पुरावा मिळुन न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अंतर्गतचे बयान वगळण्यात आले.

४. दोन्ही पक्षांच्या वतीने करण्यात आलेला युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रकरणातील वस्तुस्थिती व सादर पुरावा यावरुन पुढील मुद्दे या न्यायालयाच्या विचारार्थ उपस्थित झाले असून त्या मुद्दयांची कारणमिमांसा त्या त्या मुद्दयांसमोर निष्कर्षासहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.०८.१०.२०२० रोजी १७.०० वाजेच्या सुमारास मौजे पारनेर, ता. अंबड, जि. जालना येथे फिर्यादी-विकास बंडू भोजने याने आरोपीला २५,०००/- रूपये देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून आरोपीने त्याला चाकुने डाव्या हाताच्या तळहातावर व उजव्या मांडीवर मारहाण करून स्वईच्छेने दुखापत केली आणि त्याव्दारे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानित केले आणि त्याव्दारे भारतीय दंड संहिता कलम ५०४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

५. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी – साक्षीदार क्र.१ विकास बंडू भोजने यांची साक्ष (नि.क्र.१५) वर नोंदविण्यात आली. याउलट आरोपीने कोणताही लेखी अथवा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

**मुद्दे क्र.१ ते ३ बाबत:**

६. भारतीय दंड विधान कलम ३२४ व ५०४ प्रमाणे आरोपीविरुध्द लावण्यात आलेल्या गुन्हयाच्या शाबीतीकरिता अभियोगपक्षाला सबळ पुराव्यानिशी, आरोपीला रू.२५,०००/– देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून आरोपीने फिर्यादीला चाकूने डाव्या हाताच्या तळहातावर व उजव्या मांडीवर मारून इच्छापूर्वक दुखापत करून शिवीगाळ केली, या बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

७. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी विकास बंडू भोजने यांची साक्ष नोंदविण्यात आली. प्रकरणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या फिर्यादी याने दिलेल्या पूराव्याप्रमाणे त्याचे व आरोपी यांच्यामध्ये किरकोळ वाद झाल्याचे नमूद केले. अशा प्रकारे फिर्यादीने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही व आरोपी व त्याच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे त्याच्या साक्षीत नमुद केले आहे.

८. प्रकरणाच्या दृष्टीने फिर्यादीचा तोंडी पुरावा हा निर्णायक स्वरुपाचा होता. सदर प्रकरणी आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा व वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केले असले तरीही आरोपीच्या कृत्यामूळे फिर्यादीला दूखापत झाली, हे फिर्यादीच्या सरतपासात नमूद नाही. फिर्यादीने घटनेबाबत किंवा आरोपीविरुध्द कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता आवश्यक असलेल्या घटकांची पुर्तता होत नसल्याने आरोपी निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.३ च्या बाबतीत पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

०१. आरोपी विष्णू सुभाष मसकर, यांना भारतीय दंड संहिता कलम ३२४ व ५०४ अन्वयेच्या दोषारोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

०२. आरोपीची जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

०३. जप्त मुद्देमाल–एक लाल व पांढ–या रंगाची मूठ असलेला चाकु हा मुल्यहिन असल्याने विहीत कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

०४. आरोपीने फौ.प्र.सं.चे कलम ४३७–अ च्या पूर्ततेकामी रूपये १५०००/– चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
SIMA SACHIN
JAIN
Date: 2026.06.22
12:58:52 +0530

दिनांकः २२/०६/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.१),
अंबड

<u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :- एस. एम. सपकाळ
न्यायालयाचे नाव :- प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, अंबड
पी.डी.एफ.दिनांक :- २२/०६/२०२६

स्वा/-
लघुलेखक